# ७. लोकसंख्या

**प्रश्न १. खालील विधाने पूर्ण करा.**

**(अ) जन्मदर हा मृत्यूदरापेक्षा अधिक असल्यास लोकसंख्या......**
(i) कमी होते.
**(ii) वाढते.**
(iii) स्थिर होते.
(iv) अतिरिक्त होते.

**(आ)...... वयोगटांतील लोकांचा समावेश कार्यकारी लोकसंख्येत होतो.**
(i) ० ते १४
(ii) १४ ते ६०
(iii) १५ ते ६०
**(iv)१५ ते ५९**

**(इ) समाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार ...... घटकावर अधिक अवलंबून असतो.**
(i) लिंग गुणोत्तर
(ii) जन्मदर
**(iii) साक्षरता**
(iv) स्थलांतर

**प्रश्न २. खालील विधाने तपासा व अयोग्य विधाने दुरुस्त करा.**

**(अ) प्रदेशाच्या क्षेत्रफळावरून लोकसंख्येची घनता समजते.**
**उत्तर:** अयोग्य.
**दुरुस्त विधान:** प्रदेशाचे क्षेत्रफळ व तेथील एकूण लोकसंख्या या दोन बाबींवरून लोकसंख्येची घनता समजते.

**(आ) साक्षरतेमुळे प्रदेशातील लोकसंख्येची गुणवत्ता ठरते.**
**उत्तर:** योग्य.

**(इ) ज्या प्रदेशातून लोकसंख्येचे स्थलांतर होते,त्या प्रदेशातील मनुष्यबळावर विपरीत परिणाम होतो.**
**उत्तर:** योग्य.

**(ई) अधिक आर्थिक सुबत्ता म्हणजे प्रदेशाचा विकास होय.**
**उत्तर:** अयोग्य.
**दुरुस्त विधान:** अधिक आर्थिक सुबत्ता व त्याचप्रमाणे लोकसंख्येचे उच्च जीवनमान, जीवनाची अधिक गुणवत्ता, समान संधींची उपलब्धता आणि स्वातंत्र्य म्हणजे विकास होय.

**(उ) विकसनशील देशांचा मानव विकास निर्देशांक एक असतो.**
**उत्तर:** अयोग्य.
**दुरुस्त विधान:** विकसनशील देशांचा मानव विकास निर्देशांक ०.५०० ते ०.६०० यांदरम्यान असतो.

**प्रश्न ३. थोडक्यात उत्तरे लिहा.**

**(अ) लोकसंख्या रचनेच्या अभ्यासात कोणत्या बाबी विचारात घेतल्या जातात?**
**उत्तर:** लोकसंख्या रचनेच्या अभ्यासात पुढील बाबी विचारात घेतल्या जातात:
**(१) लिंग गुणोत्तर रचना:** लोकसंख्या रचनेच्या अभ्यासात लोकसंख्येचे स्त्री व पुरुष याप्रमाणे लिंगानुसार वर्गीकरण विचारात घेतले जाते.
**(२) वयोगट रचना:** लोकसंख्या रचनेच्या अभ्यासात लोकसंख्येचे १५ वर्षाखालील १५ ते ५९, ६० वर्षावरील इत्यादी वयोगटांनुसार वर्गीकरण विचारात घेतले जाते.
**(३) कार्यानुसार रचना:** लोकसंख्या रचनेच्या अभ्यासात लोकसंख्येचे कार्यक्षम व अकार्यक्षम यांप्रमाणे कार्यक्षमतेनुसार वर्गीकरण विचारात घेतले जाते.
**(४) निवासस्थानानुसार रचना:** लोकसंख्या रचनेच्या अभ्यासात लोकसंख्येचे ग्रामीण व नागरी यांप्रमाणे निवासस्थानानुसार वर्गीकरण विचारात घेतले जाते.
**(५) साक्षरतेनुसार रचना:** लोकसंख्या रचनेच्या अभ्यासात लोकसंख्येचे साक्षर व निरक्षर यांप्रमाणे साक्षरतेनुसार वर्गीकरण विचारात घेतले जाते.

**(आ) लोकसंख्या वितरणावर परिणाम करणाऱ्या अनुकूल व प्रतिकूल घटकांची यादी तयार करा.**
**उत्तर:** लोकसंख्या वितरणावर परिणाम करणाऱ्या अनुकूल घटकांची यादी पुढीलप्रमाणे आहे :
(१) स्वच्छ हवा, पाणी व सूर्यप्रकाश या घटकांची योग्य प्रमाणात उपलब्धता (२) सखल भूभाग (३) पर्जन्यमानाचे आणि तापमानाचे योग्य प्रमाण (४) सुपीक मृदा (५) खनिजसंपत्तीची विपुलता (६) नागरीकरण (७) कारखान्यांचा विकास (८) वाहतुकीच्या सोयींचा विकास (९) बाजारपेठांची उपलब्धता (१०) राजकीय स्थिरता (११) आंतरराष्ट्रीय शांतता (१२) अनुकूल राजकीय धोरण (१३) अनुकूल सामाजिक रूढी व परंपरा.
लोकसंख्या वितरणावर परिणाम करणाऱ्याप्रतिकूल घटकांची यादी पुढीलप्रमाणे आहे:
(१) स्वच्छ हवा, पाणी व सूर्यप्रकाश या घटकांची अनुपलब्धता.
(२) पर्वतीय प्रदेश व दुर्गम प्रदेश.
(३) पर्जन्यमानाचे आणि तापमानाचे खूप कमी किंवा खूप जास्त प्रमाण.
(४) नापीक मृदा.
(५) खनिजसंपत्तीचा तुटवडा.
(६) कारखान्यांचा अपुरा विकास.
(७) अपुरे नागरीकरण.
(८) वाहतुकीच्या सोयींचा अभाव.
(९) बाजारपेठांची अनुपलब्धता.
(१०) राजकीय अस्थिरता.
(११) आंतरराष्ट्रीय अशांतता किंवा युद्ध.
(१२) प्रतिकूल राजकीय धोरण.
(१३) प्रतिकूल सामाजिक रूढी व परंपरा.

**(इ) लोकसंख्येची घनता अधिक असलेल्या प्रदेशांत कोणत्या समस्या असतील?**
**उत्तर:** लोकसंख्येची घनता अधिक असलेल्या प्रदेशांत पुढील समस्या असतील
(१) जल, वायू, हवा व मृदा यांचे वाढते प्रदूषण.
(२) वाहतुकीची कोंडी
(३) निवासाच्या समस्या
(४) वाढती गुन्हेगारी इत्यादी.

**(ई) लिंग गुणोत्तर कमी असलेल्या प्रदेशांत कोणत्या समस्या जाणवतात?**
**उत्तर:** लिंग गुणोत्तर कमी असलेल्या प्रदेशांत पुढील समस्या आढळतात:
(१) विविध कौटुंबिक व सामाजिक समस्यांत वाढ.
(२) स्त्रियांवरील अत्याचारांत वाढ इत्यादी.

**प्रश्न ४. भौगोलिक कारणे दया.**

**(अ) लोकसंख्या हे एक महत्त्वाचे संसाधन आहे.**
**उत्तर:** (१) कोणत्याही देशाचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास हा देशाच्या लोकसंख्येची एकूण संख्या व एकूण गुणवत्ता या घटकांवर अवलंबून असतो.
(२) एखादया देशाची लोकसंख्या प्रमाणापेक्षा अधिक असेल व लोकसंख्येची गुणवत्ता कमी असेल, तर अशा देशाचा विकास संथ गतीने होतो.
(३) एखाद्या देशात लोकसंख्या पर्याप्त असेल व लोकसंख्येची गुणवत्ता उच्च असेल, तर अशा देशाचा विकास जलद गतीने होतो. अशा प्रकारे, लोकसंख्या हे एक महत्त्वाचे संसाधन आहे.

**(आ) कार्यकारी लोकसंख्या गट महत्त्वाचा असतो.**
**उत्तर:** (१) १५ ते ५९ या वयोगटांतील लोकसंख्येस कार्यकारी लोकसंख्या म्हणतात.
(२) १५ पेक्षा कमी आणि ६० पेक्षा जास्त वयोगटातील व्यक्तींचा अकार्यक्षम लोकसंख्येत समावेश होतो. देशातील अकार्यक्षम व्यक्ती कार्यकारी लोकसंख्येवर अवलंबून असतात.
(३) देशातील कार्यकारी व्यक्ती नोकरी किंवा व्यवसाय करतात व त्याद्वारे देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.
(४) कार्यकारी लोकसंख्या गटाची गुणवत्ता अधिक असेल व तरुणांचे प्रमाण जास्त असेल तर देशाचा विकास जलद गतीने होतो. म्हणून कार्यकारी लोकसंख्या गट महत्त्वाचा असतो.

**(इ) वयोगटरचनेचा अभ्यास आवश्यक आहे.**
**उत्तर:** (१) वयोगट रचनेचा अभ्यास केला असता, देशातील बालकांचे, युवकांचे, तरुणांचे, प्रौढांचे, वृद्धांचे प्रमाण समजते.
(२) वयोगट रचनेचा अभ्यास केला असता, देशातील अवलंबित लोकसंख्येचे (१५ वर्षांपेक्षा कमी वय असणारी लोकसंख्या आणि ६० वर्षांपेक्षा जास्त वय असणारी लोकसंख्या) आणि कार्यक्षम लोकसंख्येचे (१५ ते ५९ वय असणारी लोकसंख्या) प्रमाण समजते.
(३) वयोगट रचनेचा अभ्यास केला असता, शासनाला आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, वैदयकीय, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रांतील धोरणे योग्य प्रकारे निश्चित करता येतात.
(४) वयोगटरचनेचा अभ्यास केला असता, देशातील आर्थिक विकासाचा अंदाज बांधता येतो. म्हणून वयोगट रचनेचा अभ्यास आवश्यक आहे.

**(ई) साक्षरतेचा विकासाशी थेट संबंध असतो.**
**उत्तर** : (१) ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण अधिक असते, असा देश आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अधिक प्रगत होतो.
(२) ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी असते, असा देश आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या मर्यादित प्रमाणात प्रगत होतो.
(३) साक्षरतेचा जीवनमान, जीवनाची गुणवत्ता, उपलब्ध संधी आणि स्वातंत्र्य या घटकांशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंध असतो. अशा प्रकारे, साक्षरतेचा विकासाशी थेट संबंध असतो.

**(उ) मानव विकास निर्देशांकामुळे देशातील नागरिकांची खरी प्रगती कळते.**
**उत्तर:** (१) मानव विकास निर्देशांक ठरवताना आर्थिक, आरोग्य आणि शिक्षण हे तीन निकष विचारात घेतले जातात.
(२) देशातील राष्ट्रीय उत्पन्नाच्या, आयुर्मानाच्या आणि साक्षरतेच्या आधारे देशाच्या मानव विकास निर्देशांकाचे मूल्य ठरवले जाते.
(३) मानव विकास निर्देशांक देशातील नागरिकांचे जीवनमान, जीवनमानाची गुणवत्ता, नागरिकांना मिळणाऱ्या संधी, नागरिकांचे स्वातंत्र्य, सामाजिक कल्याण, लोकांचे समाधान इत्यादी घटक निर्देशित करतो. म्हणून मानव विकास निर्देशांकामुळे देशातील नागरिकांची खरी प्रगती कळते.

**प्रश्न ५. टीपा लिहा.**

**(अ) लिंग गुणोत्तर**
**उत्तर:** (१) एखादया प्रदेशातील दर हजारी पुरुषांच्या तुलनेत असलेली स्त्रियांची संख्या, म्हणजे 'लिंग गुणोत्तर' होय.
(२) लिंग गुणोत्तराचे प्रमाण पुढील सूत्राद्वारे काढले जाते:
लिंग गुणोत्तर प्रमाण

$$= \frac{\text{स्त्रियांची एकूण संख्या}}{\text{पुरुषांची एकूण संख्या}} \times १०००$$

(३) दर हजारी पुरुषांच्या तुलनेत असलेली स्त्रियांची संख्या अधिक असेल, तर लिंग गुणोत्तर अधिक असते. याउलट, दर हजारी पुरुषांच्या तुलनेत असलेली स्त्रियांची संख्या कमी असेल, तर लिंग गुणोत्तर कमी असते.
(४) २०११ च्या जनगणनेनुसार भारतात केरळ राज्यातील लिंग गुणोत्तर १९८४ होते व ते सर्वाधिक होते. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर ९२९ होते.
(५) लिंग गुणोत्तरावर पुरुषांचे बहिःस्थलांतर, स्त्रियांचा जन्मदर इत्यादी घटक परिणाम करतात.

**(आ) वयोगट रचना**
**उत्तर:** (१) लोकसंख्येची वयोगटानुसार विभागणी म्हणजे वयोगट रचना होय.
(२) वयोगट रचनेचा अभ्यास केला असता, देशातील बालकांचे, युवकांचे, तरुणांचे, प्रौढांचे, वृद्धांचे प्रमाण समजते.
(३) वयोगट रचनेचा अभ्यास केला असता, देशातील अवलंबित लोकसंख्येचे (१५ वर्षांपेक्षा कमी वय असणारी लोकसंख्या आणि ६० वर्षांपेक्षा जास्त वय असणारी लोकसंख्या) आणि कार्यक्षम लोकसंख्येचे (१५

ते ५९ वय असणारी लोकसंख्या) प्रमाण समजते.
(४) वयोगट रचना शासनास विविध धोरणे ठरवण्यास उपयुक्त ठरते.

**(इ) साक्षरता**
**उत्तर:** (१) वय वर्ष ०७ पेक्षा अधिक वयोगटातील लोकांचे साक्षर किंवा निरक्षर अशा दोन गटांत वर्गीकरण करता येते.
(२) ०७ वर्षावरील लिहिता-वाचता येणाऱ्या व्यक्तीस साक्षर समजले जाते.
(३) साक्षरतेचे प्रमाण अधिक असेल, तर देशाचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास जलद गतीने होतो. याउलट, साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यास देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासात अडथळे निर्माण होतात.
(४) साक्षरतेचा जीवनमान, जीवनाची गुणवत्ता, उपलब्ध संधी आणि स्वातंत्र्य या घटकांशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंध असतो.